**सायबर सेल पिंपरी चिंचवड**
**पोलीस आयुक्त कार्यालय पिंपरी चिंचवड पुणे**
**दुरध्वनी क्रमांक 020-27350120**


| प्रेसनोट | पिंपरी चिंचवड | दिनांक - १०/०५/२०२४ |
| --- | --- | --- |

# पार्ट टाईम जॉबच्या नावाखाली फसवणुक करणा-याला मिरा भाईदर ठाणे येथुन अटक

सांगवी येथिल फिर्यादी हे घरी असताना त्यांना व्हॉटस् अप मोबाईल याच्यावरुन Ignigte itergreted marketing egence carlule.bkexin.com या एजन्सीची भरती आहे. तुम्ही तुमच्या घरातून पार्ट टाईम जॉब करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी आरोपी यांनी फिर्यादी यांना संपर्क साधुन आमची कंपनी रेस्टॉरेंट आणि हॉटेलचा बिझनेस वाढविण्यासाठी जाहीरात करत आहे त्यामध्ये आपल्याला घर बसल्या आमची मदत करता येईल त्याबदल्यात आपल्याला मोबदला देण्यात येईल असे सांगुन फिर्यादी यांचे हॉट्सअप वर लिंक पाठवुन ती लिंक ओपन करुन त्यातील टास्क लाईक आणी शेअर करण्यास सांगुन फिर्यादीचा यांचा विश्वास संपादन करुन सुरवातीला फिर्यादी यानी ५०००/- रुपये गुंतवणुक करुन त्यांना त्याबदल्यात ६५००/- रुपये परतावा देवुन अशा प्रकारे फिर्यादी यांना वेळोवळी वेगवेगळे टास्क व लिंक पाठवुन फिर्यादी यांना त्याचा मोबदला मिळाल्याने तसेच आरोपी यानी फिर्यादी यांना अधिक परतावा मिळण्याचे अमिष दाखवुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून BTC USDT या मध्ये गुतंवणुक केल्यास आपल्याला अधिक फायदा होवु शकतो असे सांगुन फिर्यादी यांना वेगवेगळया खात्यावर पैसे घेवुन फिर्यादी यांची एकुण **३२,९२,५६३/- रुपयाची गुंतवुक** करण्यास भाग पाडुन ऑनलाईन आर्थिक फसवणुक केले बाबत **सांगवी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं ०८/२०२४ भा.द.वि कलम ४१९, ४२० आय.टी. ॲक्ट ६६(डी) अन्वये** गुन्हा दाखल केला आहे. सदरचा गुन्हयाची व्याप्ती खुप मोठया प्रमाणावर असल्याने मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी सदरचा गुन्हा पोलीस निरीक्षक, सायबर सेल, गुन्हे शाखा यांच्याकडुन समांतर तपास करण्याचे आदेशित केले होते. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने तांत्रिक विश्लेषणाव्दारे आरोपीचा शोध घेतला असता त्यातील आरोपी नामे जैईद जाकिर खान वय- २० वर्षे, व्यवसाय- शिक्षण रा. मु.पो. फ्लॅट नं १०२, सारुपी कावेरी हौ.सो.नयानगर मिरा भाईदर यांना सदर गुन्हयात सहभाग असल्याने अटक करण्यात आले असुन त्यांच्याकडुन ०१ मोबाईल जप्त करण्यात आले आहे.

सदर गुन्हयात तक्रारदार यांनी आरोपीचे बँक अकऊंटला पैसे भरलेले आहेत. सदर अकाऊंटची माहीती घेतली असता त्या अकाऊंटला एकुण **१८,००,०००/- रुपये पेक्षा** जास्त रक्कमेचे ट्रान्झेक्शन झाले असल्याची प्राथमिक माहीती प्राप्त झालेली आहे. तसेच अटक आरोपीविरुध्द भारतातील इतर राज्यात ०२ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.तसेच सदर आरोपीने इतर ओळखीच्या नावाने अकाऊंट काढुन दिले आहेत.

सदरची कारवाई मा. विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. संदिप डोईफोडे पोलीस उपआयुक्त,गुन्हे पिंपरी चिंचवड, मा.विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड यांच्या मार्गदर्शनाखाली **वपोनि वैभव शिंगारे, सपोनि प्रविण स्वामी, पोलीस उपनिरीक्षक रविंद्र पन्हाळे, पोशि २५६३ अतुल लोखंडे, पोशि २३०० कृष्णा गवळी, (सर्व नेमणुक सायबर सेल)** यांच्या पथकाने केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे,
पिंपरी चिंचवड.